Email - zpbuldhana.ee@mahapwd.com


## विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना

विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचे नाव, उद्दीष्ट व पात्रतेचे निकष खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजनेचा उद्देश | पात्रतेचे निकष व अटी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | रस्ते दुरुस्ती कार्यक्रम | देखभाल व दुरुस्ती करीता असलेल्या रस्त्यांचे लांबीतील अतिआवश्यक दुरुस्ती करुन रस्ते वाहतुकी योग्य ठेवणे | आवश्यक असलेल्या पृष्ठभागाचे नुतणीकरण, रस्त्याचे बाजुच्या गटाराची सुधारणा, घाट रस्त्याची दुरुस्ती, खड्डे भरणे, पुल व मोऱ्यांची दुरुस्ती, इ. वाहतुक वर्दळ व पुर्वी केलेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने क्रमवारीनुसार कामांची निवड करणे | शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या निधीचा मर्यादित कार्यक्रम तयार करावयाचा असल्याने सर्व पात्र कामांचा समावेश कार्यक्रमात करता येत नाही. |
| २. | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | ५०० लोकसंख्या असलेल्या गावातील अंतर्गत रस्ते करणे पांदन रस्ते, जोड रस्ते, शेत रस्ते व स्मशानभुमी पोचमार्ग व रस्ते मजबुतीकरण करणे, रोजगार हमी योजना कामावरील मजुरांना रोजगार तथा सुखसोई उपलब्ध करुन देणे | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गावामधील गरजु मजुरांना तात्काळ रोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता सदरहु योजना अंमलात आणण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार (रु. २५.०० लाखापर्यंत) तालुकास्तरावरील उपअभियंता यांना देण्यात आले असुन प्रशासकीय मंजुरीचे अधिकार ग्रा.पं. स्तरावरील कामास गट विकास अधिकारी यांना व यंत्रणा स्तरावरील अधिकार तहसिलदार यांना देण्यात आलेले आहेत. सदर योजना ही तालुका स्तरावर राबविण्यात येते. | प्रशासकिय मंजुरी प्रदान केल्यानंतर काम तातडीने सुरु करुन मजुरांना रोजगार उपलब्ध करुन दिल्या जातो. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | स्थानिक विकास कार्यक्रम (खासदार / आमदार) | खासदार / आमदार महोदय यांनी सदर योजने अंतर्गत प्रस्तावित केलेल्या कामांची अंदाजपत्रके मा. जिल्हाधिकारी यांचे कडुन मंजुर करुन घेवुन अविकसीत भागाचा विकास करणे,  उदा. शाळा बांधकाम, समाजमंदीर, चावडी, रस्ते डांबरी करणे / शाळा व स्मशानभुमी कंम्पाऊड करणे | सदर योजनेतील कामे खासदार/आमदार यांचे शिफारशीनुसार नियोजन विभागामार्फत राबविले जातात. मा. खासदार यांना रु. ५.०० लाख पावेतो कामे प्रस्तावित करता येतात. या कामांना तांत्रिक मंजुरी देण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता व प्रशासकिय मंजुरीचे अधिकार मा. जिल्हाधिकारी (नियोजन) यांना आहेत व कामाचा निधी जिल्हा नियोजन विभागामार्फत वितरीत केला जातो. | जिल्हाधिकारी यांनी  मंजुर केलेली कामे तातडीने हाती घेण्यात येतात. |
| ४. | आरोग्य विभाग/ पशुसंवर्धन विभाग/शिक्षण विभाग अंतर्गत इमारतीची बांधकामे करणे | जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभाग/पशुसंवर्धन विभाग/शिक्षण विभाग यांनी सुचविलेले व प्रशासकीय मंजुरी दिलेल्या इमारतीची बांधकामे करणे उदा. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्र, आयुर्वेदीक दवाखाने, शवविच्छेदन गृह, वैद्यकीय अधिकारी /कर्मचारी निवासस्थाने  गुरांचे दवाखाने, माध्यमिक शाळा इमारतीची बांधकामे करणे | जिल्हा परिषद स्तरावरील विषय समिती/पशुसंवर्धन विषय समिती/शिक्षण समिती यांनी विषय समितीच्या सभेत शासनाच्या निकषानुसार मंजुर केलेली इमारतीची कामे या विभागामार्फत करण्यात येतात | निधीच्या उपलब्धते नुसार कामे हाती घेण्यात येतात. |
| ५. | इमारत परिक्षण व दुरुस्ती | जिल्हा परिषदेच्या वापरात असलेल्या शासकिय इमारती तसेच जिल्हा परिषदेच्या मालकीच्या इमारतींची देखभाल व दुरुस्ती करणे | शासकिय इमारतीकरीता जोताक्षेत्र फळाच्या दरानुसार शासनाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीमधुन आवश्यक असलेल्या इमारतींची दुरुस्तीच्या कामांची निवड करणे तसेच जिल्हा परिषदेच्या मालकीच्या इमारतींची जिल्हा परिषद सेस फंडातुन दुरुस्तीच्या कामांची निवड करण्यात येते व  जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार इमारतीची दुरुस्ती व देखभाल करण्यात येते. | निधीच्या उपलब्धते नुसार कामे हाती घेण्यात येतात. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | १३ वा वित्त आयोगा अंतर्गत बांधकाम करणे (जि.प. स्तर) | या योजनेअंतर्गत सार्वजनिक सेवा व सुविधा अंतर्गत गावातील सिमेंट कॉक्रीट रस्त्यांची बांधकामे करणे, दफन व दहन भुमींचे व्यवस्थापन करणे, तसेच सार्वजनिक स्वच्छता सोई अंतर्गत गावातील नाली /गटारांचे बांधकाम करणे | जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेल्या कामांची बांधकामे या विभागामार्फत करण्यात येतात. | निधीच्या उपलब्धते नुसार कामे हाती घेण्यात येतात. |
| ७. | १३ वा वित्त आयोग रस्ते (राज्यस्तर) | | | |
| ८. | तिर्थक्षेत्र यात्रास्थळ व पर्यटन स्थळांचा विकास करणे | यात्रास्थळांच्या व पर्यटन स्थळांच्या ठिकाणी यात्रेकरुंना निवाऱ्यासाठी धर्मशाळा/भक्तनिवास/ पिण्याचे पाण्याची व्यवस्था/पोचमार्ग इत्यादी व्यवस्था पुरविणे. | जिल्हा नियोजन व विकास मंडळाने निवड व मंजुर केलेल्या "क" वर्गातील स्थळांचा विकास करण्यात येतो. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई शासन स्तरावरुन "क" वर्ग तिर्थक्षेत्रांना "ब" वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा प्रदान करुन विकास कामांसाठी निधी मंजुर करण्यात येतो व भाविकांना यात्रास्थळाचे ठिकाणी मुलभुत सुविधा पुरविण्यात येतात. | निधीच्या उपलब्धते नुसार कामे हाती घेण्यात येतात. |